


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे | अंक : ६२६ . वा | बुधवार | दि. १३ डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# जिजाऊ बँक उपोषणाच्या इशाऱ्याने सहकार विभागात उडाली खळबळ...

## आधी संथ कारवाई, आता उपोषण मागे घेण्याची केली सूचना...

जनसंचलन/ बुलढाणा

अमरावती येथील नेहमी चर्चेत असलेली जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँकेत होत असलेल्या अनिर्बंध भ्रष्टाचाराच्या विरोधात तसेच इतर विविध मागण्यांसाठी उपोषणाचा इशारा देण्यात आल्यामुळे राज्याच्या सहकार विभागात खळबळ उडाली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँकेचे अध्यक्ष अविनाश अंबादास कोठाळे यांच्या भ्रष्टाचाराकडे सातत्याने दुर्लक्ष करीत असलेला सहकार विभाग आता कारवाई करीत असल्याचे दाखवत असून, उपोषण न करण्याची सूचना उपोषणकर्त्यांना करण्यात आली आहे. यासंदर्भातील एक पत्र उपोषणकर्त्यांना कमिशनर कार्यालया कडून देण्यात आलेले आहे. दरम्यान, उपोषणाचा इशारा दिलेल्यांनी आपला निर्णय ठाम ठेवला असून, बुधवार १३ डिसेंबरपासून ते उपोषणाला सुरवात करीत आहेत. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने अमरावती येथील जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँकेत वर्षानुवर्षापासून सुरू असलेल्या भ्रष्टाचारासंदर्भात नियमित स्वरूपात वृत्तमालिका प्रकाशित करून या बँकेत होत असलेल्या विविध घोटाळ्यांची माहिती पुराव्यांसह आपल्या वाचकांपर्यंत पोहोचवली आहे. अविनाश अंबादास कोठाळे व त्यांच्या काही नालायक संचालकांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करणे, बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करणे, प्रशासकाची नेमणूक करणे, तसेच

**जिजाऊ कमर्शियल अमरावती बँकेचा प्रताप भाग-२००**

घोटाळेबाजांवर कायदेशीर कारवाई करणे, यासाठी उत्तम चरपे, बाळासाहेब वैद्य, सुरेश उमक, दिगंबर पुरी आणि स्वप्नील देशमुख मागील वर्षी देखील हिवाळी अधिवेशनादरम्यान मंत्रालयावर उपोषण केले होते. त्यावेळी सहकार आयुक्त अनिल कवडे यांनी प्रत्यक्ष उपोषणकर्त्यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्या सोडवण्याचे तसेच जिजाऊ बँकेतील भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते. जसे यापूर्वी सहकार खात्याने या बँकेत होत असलेल्या घोटाळ्यांकडे कानाडोळा केला होता, तसाच तो या आश्वासनानंतरही सुरूच होते. उपोषणकर्ते सातत्याने सहकार विभागाकडे मागणी करीत राहिले. परंतु सहकार विभाग केवळ चौकशांचा फार्स करीत राहिले. वर्षानुवर्षे बँकेचे अध्यक्ष अविनाश अंबादास कोठाळे व त्यांचे काही लुटारू संचालक बँकेत प्रचंड भ्रष्टाचार करून बँक डबघाईला आणत आहेत. तसेच बँकेला कोट्यवधी रुपयांचा चुना लावत आहेत. बँकेतील गैरव्यवहारांची चौकशी करणाऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम सहकार विभाग तसेच सहायक निबंधक व जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील अधिकारी निरंतर करीत आहेत. मागील उपोषणाच्या वेळी उपोषणकर्त्यांना दिलेल्या आश्वासनाप्रमाणे काही महिन्यांपूर्वी बँकेची कलम ८९ प्रमाणे चौकशी करण्यात आली आहे, परंतु उपोषणकर्त्यांचा आरोप आहे की, कलम ८९ अ-१ अंतर्गत बँकेची जी चौकशी करण्यात आली आहे, त्यात उपोषणकर्त्यांनी मांडलेल्या अनेक गंभीर मुद्द्यांना चौकशीत गांभीर्याने घेतलेच गेले नाही. तपासादरम्यान तपासी अधिकारी जिल्हा उपनिबंधक महेंद्र चव्हाम यांनी बँकेकडून मिळवलेल्या माहितीवरच आपला अहवाल तयार केला. बँकेच्या संचालकांशी व तक्रारकर्त्यांशी त्यांनी कोणतीही चर्चा केली नाही. याशिवायकलम ८३ अंतर्गत चौकशीचे आदेश देताना सहकार विभागाने उपोषणकर्त्यांनी उपस्थित केलेल्या अनेक मुद्द्यांवर चौकशीच करण्यात आली नाही. बँकेच्या नोकर भर्तीसंदर्भात अध्यक्षांच्या व उपाध्यक्षांच्या तसेच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अपात्रतेच्या संदर्भातील चौकशीत आढळलेली आर्थिक व गुन्हेगारी स्वरूपाची प्रकरणे सहकार विभागाने ८३ च्या चौकशीतून हेतुपुरस्सरपणे वगळली. अवैधरित्या करण्यात आलेल्या मवन टाईम सेटलमेंटफ्या प्रकरणांमध्ये सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई होणे गरजेचे आहे. यामध्ये मोठा घोटाळा झालेला आहे. त्याचीही चौकशी करण्यात आलेली नाही. याशिवाय उपोषणकर्त्यांच्या मागण्या आहेत की, संगणक प्रणालीत झालेल्या फ्रॉड बद्दल संपूर्ण संगणक यंत्रणेचे फॉरेंसिक ऑडिट करण्यात यावे. बँकेच्या कामकाजाचे सदोष इतिवृत्त लिहिणाऱ्यांवर




**रिझर्व्ह बँकेने दिलेल्या माहिती प्रमाणे बी.आर. नियमानुसार ८ वर्षाच्या कालावधीनुसार त्या पदावर राहता येत नाही तो नियम जिजाऊ कमर्शियल को ऑप बँक अमरावतीला लागू होत नाही का असा प्रश्न सुज्ञ ग्राहकांमध्ये जोर धरत आहे**

कठोर कारवाई करण्यात यावी, अपात्र व योग्य आर्थिक स्थिती नसलेल्या लोकांना जी नियमबाह्य कर्जे वाटण्यात आली आहेत, त्याची चौकशी करण्यात यावी. कलम ८९ अंतर्गत बँकेची जी चौकशी करण्यात आली आहेत,

उर्वरित पान २ वर...

# अंत्रीखेडेकर येथील ग्रामपंचायत सदस्य व गावकरी करणार बांधकाम विभागा विरोधात उपोषण...

जनसंचलन/ चिखली

चिखली तालुक्यातील मौजे अंत्रीखेडेकर येथील ग्रामपंचायत सदस्य सौ उषा राम माळेकर भाजपा सदस्य व गावकरी मंडळी २६ जानेवारी २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथे मौजे अंत्री खेडेकर येथील प्रमुख जिल्हा मार्ग ३१ याच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूस अंतिम हादी नुसार नाल्या खोदकाम व रोडचे रुंदीकरण करण्यात यावे यासाठी अंत्री खेडेकर येथील ग्रामपंचायत सदस्य सौउषा राम माळेकर अंत्री खेडेकर येथील ज्ञानेश्वर यादव खेडेकर एकनाथ रामराव माळेकर आत्माराम अण्णा पवार व इतर गावकरी हे जिल्हाधिकार्यालय बुलढाणा येथे बेमुदत आमरण उपोषण करणार आहेत सार्वजनिक बांधकाम विभाग यांना वेळोवेळी तक्रारी करून सुद्धा त्यांनी कोणत्याही प्रकारची दखल न घेता उडवा उडवी चे उत्तरे देऊन तक्रारकर त्यांचे लक्ष विचलित केले आहे त्यामुळे अखेर तक्रार करते यांनी आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबलेला आहे अमोना देळगाव धनगर मेरा खुर्द अंत्री खेडेकर प्रमुख जिल्हा मार्ग ३१ या रस्त्याच्या दोन्ही बाजूला भरपूर ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे वेळोवेळी सार्वजनिक बांधकाम विभाग बुलढाणा व उपविभाग देळगाव राजा यांच्याशी वेळोवेळी तक्रर करून सुद्धा त्यांनी तक्रारीला केराची टोपली दाखवलेली आहे प्रमुख जिल्हा मार्ग ३१ हा रस्ता जिल्हा परिषद बांधकाम खात्याकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित झालेला असून हस्तंतरणाची कोणतीही कागदपत्रे उपविभागीय कार्यालय कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे या कार्यालयाचे सदर रस्त्याची रुंदी ची माहिती व भूसंपादन बाबतची माहिती जिल्हा परिषद बांधकाम खाते यांना कळविले नाही प्रमुख जिल्हा मार्ग ३१ ची मोजणी करण्याबाबत भूमी अभिलेख कार्यालय चिखली यांनी या कार्यालयाचे १६ /१०/ २०२३ रोजी पत्र दिले आहे परंतु आजपर्यंत कोणत्याही प्रकारची प्रमुख जिल्हा मार्ग ३१ ची मोजणी झालेली नाही तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग बुलढाणा यांनी अंत्री खेडेकर येथील अतिक्रमण हे संबंधित ग्रामपंचायत ने काढायचे आहे व त्यानुसार अंत्री खेडेकर व मेरा खुर्द या गावातील अतिक्रमण हे त्या ग्रामपंचायत ने काढून घेण्याकरता संबंधित ग्रामपंचायत ही ३ /१० /२०२३ रोजी पत्र पाठवले आहे परंतु यावर सुद्धा कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. अंत्रीखेडेकर येथील सचिव व सरपंच यांना सार्वजनिक बांधकाम विभाग उपविभाग देळगाव राजे यांनी ११/ १२ /२०२३ रोजी एक पत्र पाठवून आपल्यातील अतिक्रमण आपण काढावे असे पत्र पाठवलेले आहे विशेष कृती आराखडा तयार करून अतिक्रमण काढण्यात यावे असे पत्र आदेशित केलेले आहे

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# तुरीच्या वावरात गांजा लावला एलसीबीच्या पथकाकडून कारवाई!

# लोणार तालुक्यातील हत्ता शिवारात गाजांची झाडे...



**जनसंचलन/ लोणार**

लोणार तालुक्यातून मोठी बातमी समोर येत आहे. बुलडाणा एलसीबी पथकाने हत्ता शिवारातील एका शेतात छापेमारी केली आहे. या शेतात शेकडोच्या पटीत गांजाची झाडे असल्याचे सांगण्यात येत आहे. दि १२ डिसेंबरच्या सायंकाळ पासून सुरू झालेली ही कारवाई पहाटे पर्यंत चालणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

हत्ता शिवारातील गट नंबर १८१ मध्ये अनिल धुमा चव्हाण याने स्वतः च्या शेतातील तुरीच्या शेतात बंदी असलेली गांजाची झाडे लावली आहेत. एलसीबी पथकाला गोपनीय सूत्रांकडून माहिती मिळाल्यानंतर पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या मार्गदर्शनात एलसीबी पथक हत्ता शिवारातील तुरीच्या शेतात सायंकाळी दाखल झाले. गांजांच्या झाडांची संख्या शेकडोंच्या पटीत आहेत, सध्या अंधार असल्याने बॅटरीच्या प्रकाशात पोलीस गांजांची झाडे शोधत आहेत..ही कारवाई पहाटे पर्यंत चालण्याची शक्यता असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. दरम्यान एलसीबी पथकाला येऊन कारवाई करावी लागत असल्याने लोणारचे पोलीस झोपलेत का ? अवैध धंद्यांवर लोणार पोलिसांचा वचक नाही का असा सवाल उपस्थित होऊ लागलाय..

## पान १ वरून जिजाऊ बँक उपोषणाच्या इशाऱ्याने...

त्यात बँक प्रशासनाच्या वतीने जो खुलासा देण्यात आला आहे, त्यात निखालस खोटी माहिती देण्यात आलेली आहे. त्यामुळे अशाप्रकारे खोटी माहिती प्रसृत केल्याप्रकरणी अध्यक्ष व संचालकांवर कारवाई करण्यात यावी. कर्जदारांना कर्जवाटप केल्यानंतर त्यावर समान असे व्याज आकारणे गरजेचे आहे. परंतु संचालक मंडळाच्या निकटच्या लोकांना कमी व्याजदर व दुसऱ्यांकडून जास्त दराने व्याज वसूल करण्यात येत आहे. या सर्व विषयांची सखोल चौकशी करावी व दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे.

सहकार विभागाते दणाणले धाबे

दरम्यान, पुन्हा एका उपोषणकर्त्यांनी उपोषणाचा इशारा दिल्यामुळे सहकार विभागात चांगलीच खळबळ उडाली आहे. उपोषणाच्या दोन दिवस आधी सहकार विभागाच्या पुणे कार्यालयातून उपोषणकर्ते चरपे यांना सहकारी संस्थांचे उपनिबंधक आनंद कटके यांनी एक पत्र पाठवून आपल्या मागण्यांवर जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँकेची चौकशी सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच बँकेवर प्रशासक नियुक्त करण्यासंदर्भात निर्णय रिझर्व्ह बँक घेत असल्याचे सांगण्यात आले. सोबतच उपोषण न करण्याची सूचना करण्यात आली आहे. परंतु एक वर्षापूर्वी दिलेल्या आश्वासनाची योग्य ती पुर्तता सहकार विभागाने केली नाही, त्यामुळेच की काय पुन्हा एकदा उपोषणाचा इशारा दिल्यामुळे सहकार विभागातील अधिकाऱ्यांचे धाबे दणाणल्याचे दिसून येत आहे. आता सहकार विभागाकडे उपोषणकर्त्यांना द्यायला उत्तर नसल्या कारणाने अधिकाऱ्यांची भंबेरी उडाल्याचे पहायला मिळते आहे.

# भाजपा किसान मोर्चा बुलडाणा तालुका अध्यक्षपदी भगवान एकडे यांची निवड



**जनसंचलन/बुलढाणा**

भारतीय जनता पार्टिचे निष्ठवंत धडाडिचे व्यक्तिमत्व भगवान एकडे, यांनी या आधी सुद्धा महत्वाच्या पद-ावर काम केले आहे,२ वेळा भाजयुमो तालुका अद्यक्ष म्हणून २००९ ते २०१५ पर्यन्त, त्यांनी पार्टीशी प्रामाणिक राहून अनेक आंदोलने करुन शेतकऱ्यांच्या समस्या सोडवून लोकांना पार्टीशी जोडण्याचे काम केले,युवा मोर्चा काय, काय काम करू शकतो हे त्यावेळेस त्यांनी दाखवून दिले,एक वेळ बुलडाणा भाजपा शहर सरचिटणीस म्हणून त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे,तसेच बुलडाणा लघु व्यवसायिक संघटना च्या माध्यमातून अनेक मोर्चे, उपोषण,आंदोलन करून जनतेला न्याय मिळवून देण्याचे काम केले,वेळ प्रसंगी त्यांच्या वर आन्द-ोलनाचे केसेस होऊन गुन्हे सुद्धा दखल आहे,परंतु त्याची तमा न बाळगता समाज कार्य अविरत सुरु ठेवले,बुलडाणा कृषि उतपन्न बाजार समितीचे संचालक म्हणून निवड झाली होती तेव्हा सुद्धा बाजार समिती च्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या समस्या सोडविन्याचे काम केले,शेतकऱ्यांच्या संकटाच्या वेळी एकमेव भारतीय जनता पार्टिच खम्बीर पणे अभी असते,आणि शेतकऱ्यांच्या समस्या सोडविन्याचे काम फक्त भाजपा च करू शकते असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला,या पुढे ही किसान मोर्चा तालुका अध्यक्ष म्हणून आपन शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सदैव तत्पर राहु असे सांगितले,वरिष्ठ नेते आ. संजय कुटे, आ.आकाश फुंडकर,आ,श्वेताताई महाले, माजी आ, विजयराज शिंदे,दीपक वारे, जिल्हाध्यक्ष गणेश मांटे, यांच्या मार्गदर्शनखाली किसान अघाड़ी जिल्हाअध्यक्ष संतोष देशमुख, संयोजक सुधाकर गीते,यांनी एका पत्रद्वारे नियुक्ति केली आहे,,

# आदिवासी समाजांनी आपली राजकीय शक्ती दाखवण्याची वेळ आली- दशरथ मडावी

## आदिवासी संघर्ष परिषद उमरखेड येथे संपन्न जिल्हाध्यक्ष,जितेंद्र अ.कुलसंगे

**जनसंचलन/बुलढाणा**

आदिवासींचे नायक तंट्या मामा भिल्ल व सोमा डोमा उमरेयांच्या स्मृती दिनानिमित्ताने बिरसा क्रांती दल द्वारा आयोजितआदिवासी संघर्ष परिषद उमरखेड येथे पार पडली सर्वप्रथम या संघर्ष परिषदेला रॅली काढून सुरुवात करण्यात आली त्यानंतर ही रॅली कृषी उत्पन्न बाजार समिती या प्रांगणामध्ये आल्यावर सर्व बिरसा क्रांती दल पदाधिकारी व बिरसा क्रांती दल संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दशरथ मडावी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले रॅलीचे रूपांतर हळ-हळू सभेत झाले मोठ्या संख्येने सर्व नांदेड,यवतमाळ किनवट तालुक्यातून जिल्ह्यातून या परिषदेला मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज बांधव उपस्थित होता या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बिरसा क्रांती दल राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष दशरथ मडावी होते तर उद्घाटक म्हणून सामाजिक कार्यकर्ते साहेबराव कांबळे बेलखेडकर होते व मंचावर उपस्थित महाराष्ट्र राज्य अध्यक्ष रंगराव काळे, महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष डी बी अंबुरे, महिला फोरम महाराष्ट्र राज्य अध्यक्षा गिरिजा उईके, राज्य प्रशिक्षक बी व्ही एफ नारायणराव पिलवंड, राज्य महासचिव किरण कुमरे आदी मान्यवर उपस्थित होते या आदिवासी संघर्ष परिषदेच्या व्यासपीठावरनं बिरसा क्रांती दल राष्ट्रीय अध्यक्ष दशरथ मडावी यांनी आता आदिवासी समाज जागरूक होत असून त्याला आपल्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची जाणीव होत आहे त्यामुळे समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरुद्ध



लढण्यासाठी राजकीय शक्ती निर्माण करण्यासाठी लवकरच राजकीय पक्ष स्थापन होणार असून यातून समाजाच्या समस्या विरोधात आवाज उठवण्याचा प्रयत्न केला जाईल अशी घोषणा यावेळी त्यांनी व्यासपीठावरनं केली आदिवासी संघर्ष परिषदेचा मुख्य उद्देश कधी नव्हे तेवढे या काळात आदिवासी समुदायांनी आपल्या आत्मसन्मानासाठी अधिक जागरूक राहण्याची गरज निर्माण झाली आहे अनेक बाजूंनी आदिवासींच्या विरुद्ध षडयंत्र सुरू आहे काही दृश्य आ-हेत तर काही षडयंत्र अदृश्य आ-हेत जर ही सनातनी षडयंत्र यशस्वी झाली तर आदिवासी समुदाय येणाऱ्या काळात आपला सन्मान गमावून गुलामीच्या पथावर अग्रेषित होईल अशी भीतीदायक स्थिती निर्माण झाली आहे म्हणून या सर्व विषयांवर चर्चा करण्यासाठी आदिवासींचे नायक तंट्या मामा भिल्ल व सोमा डोमा उमरे यांच्या स्मृती दिनानिमित्ताने बिरसा क्रांती दल द्वारा आयोजित आदिवासी संघर्ष परिषद उमरखेड या ठिकाणी पत्रकारांच्या उपस्थितीत ही आदिवासी संघर्ष परिषद आयोजित करण्यात आली यावेळी सर्व बिरसा क्रांती दलाचे पदाधिकारी बिरसा क्रांती दल कर्मचारी संघटनेचे नांदेड ग्रामीण जिल्हाध्यक्ष रमेश कोवे, बिरसा क्रांती दल संघटनेचे नांदेड ग्रामीण जिल्हाअध्यक्ष जितेंद्र अ . कुलसंगे, बिरसा क्रांती दल नांदेड ग्रामीण जिल्हा मीडिया प्रमुख प्रणय कोवे ,बिरसा क्रांती दल मांडवी सर्कल अध्यक्ष मोहन कन्नाके, बिरसा क्रांती दल विधानसभा प्रभारी संतोष कन्नाके, व उमरखेड येथील संपूर्ण पदाधिकारी आयोजक या सर्वांच्या उपस्थितीत आदिवासी संघर्ष परिषद पार पडली.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पंचनाम्यांचा घोळ शासनाचा वेळकाढूपणा - संदीपदादा शेळके

## मेरा बू. येथील वन बुलढाणा मिशनच्या संवाद मेळाव्यात शासनाच्या धोरणांचा घेतला समाचार...

**जनसंचलन/ चिखली**

एकीकडे सरकार विकसित तंत्रज्ञानाचा वापर केला जात असल्याचा दावा करते. शासकीय योजनेचा लाभ पाहिजे असेल तर ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे सांगितले जाते. अवकाळी पावसाने अतोनात नुकसान झाले. मग उपग्रहाद्वारे ऑनलाईन पंचनामे का केले जात नाहीत. शासनाचा हा वेळकाढूपणा असल्याचा घणाघात वन बुलढाणा मिशनचे संकल्पक संदीपदादा शेळके यांनी केला. वन बुलढाणा मिशनच्या जाहीरनामा जनतेचा कार्यक्रमांतर्गत ९ डिसेंबर रोजी मेरा बु. येथे आयोजित संवाद मेळाव्यात ते बोलत होते. मंचावर सरपंच अनितातोई वायाळ, उपसरपंच दिनकर डोंगरदिवे, दत्तात्रय पडघान, राजेंद्र पडघान, सुधीर पडघान, गजानन पडघान, सचिन खेडेकर, वसंतराव पडघान, अमोल पडघान, रमेश अवचार, संदीप वायाळ, नितीन ठोसरे, शिवदास पडघान, सत्तार पटेल, श्रीकांत इंगळे, भारत पडघान, बाळू पाटील आदींची उपस्थिती होती. पुढे बोलतांना संदीपदादा शेळके म्हणाले, जनतेला सिंचन, रोजगार, शिक्षण, आरोग्य, चांगले रस्ते, वीज, पाणी आदी प्रमुख सुविधा हव्यात. याबाबत अजूनही ठोस काम झालेले नाही. त्याचा परिणाम नागरिकांमध्ये रोष निर्माण झालाय.



लोकं आता बोलू लागलेत. त्यांना बदल हवाय. वन बुलढाणा मिशनने आणलेली जाहीरनामा जनतेचा ही संकल्पना जिल्हावासियांना भावलीय. प्रत्यक्ष भेटून, पत्राद्वारे, फोन, सोशल मीडिया यामाध्यमातून नागरिक विकासाच्या अनुषंगाने आपली मते व्यक्त करीत आहेत. मेरा बु. हे चिखली तालुक्यातील राजकीय, सामाजिकदृष्ट्या वजनदार गाव. निवडणुकांमध्ये मेरा सर्कलकडे सर्वांच्या नजरा असतात. खडकपूर्णामुळे बराचसा परिसर सिंचनाखाली आलेला आहे. मेरा चौकी केळीसाठी प्रसिद्ध असून चिखली-जालना महामार्गावरील वाहने केळी घेण्यासाठी थांबतात. याठिकाणी केळीवर प्रक्रिया करणारा प्रकल्प उभा राहिल्यास युवकांना रोजगार मिळेल. भविष्यात यासाठी प्रयत्न करु, अशी ग्वाही संदिपदादा शेळके यांनी दिली. संवाद मेळाव्याच्या अनुषंगाने मेरा बू., मेरा खु., अंत्री खेडेकर, मनुबाई, पिंपळगाव, चंदनपुर, भरोसा यासह परिसरातील नागरिकांशी संदिपदादा शेळके यांनी हितगुज साधले. वन बुलढाणा मिशनची भूमिका मांडली. येणाऱ्या काळात राबवण्यात येणारी ध्येयधोरणे, कल्पना याबाबत चर्चा केली. नागरिकांनी प्रतिसाद अन खंबीर पाठिंबा दिला. वन बुलढाणा मिशन ही लोकचळवळ जनमनात रुजल्याचे याद्वारे दिसून येत असल्याचे संदिपदादा शेळके म्हणाले.

# प. पू. शुकदास महाराज जय घोषाने दुमदुमला आश्रम!

## जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन...

**जनसंचलन/ हिवरा आश्रम**




विवेकानंद आश्रमात प. पू. शुकदास महाराज यांची जयंती सोमवारी भक्तिभावाने व उत्साहात संपन्न झाली. महाराजांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी सकाळपासूनच आश्रमात गर्दी केली होती. शुकदास महाराजांच्या जयघोषाने विवेकानंद आश्रम अगदी दुमदुमून गेला होता. शुकदास महाराजांचा प्रत्यक्ष सहवास लाभलेले व त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळालेल्या भाविकांना त्यांच्या आठवणीने गहीवरून आले होते. सहभागी भाविकांनी विवेकानंद स्मारक व हरिहरतीर्थ, शिवउद्यानालाही भेट देऊन प्रतिमांचे पूजन केले. महाराजांच्या जयंतीनिमित्त मोफत आरोग्य शिबिर संपन्न झाले. ग्रामीण रुग्णालय येथे झालेल्या या शिबिरात शेकडो रुग्णांनी आपल्या आरोग्याची तपासणी करून घेतली. जिल्ह्यातील अनेक डॉक्टरांनी त्यात आपली बहुमूल्य सेवा दिली. विज्ञान प्रदर्शनानिमित्त बालवैज्ञानिकांनी काढलेली विज्ञान दिंडी सर्वांच्या आकर्षणाचा बिंदू ठरली. तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात अनेक बालवैज्ञानिकांनी आपल्या उपकरणांचे प्रदर्शन भरविले. जिल्हाभरातील स्पर्धेत सहभागी वक्त्यांनी दिवसभर आश्रमाचे व्यासपीठ भाषणाने दणाणून सोडले, शुकदास महाराज यांच्या जयंती निमित्त मान्यवरांच्या हस्ते समाधीचे पूजन करण्यात आले. इस्रो व विज्ञान भारती नागपूरच्या संयुक्त विद्यमाने स्पेस ऑन व्हील ही चालतीफिरती विज्ञान प्रयोगशाळा पाहण्यासाठी विद्यार्थी व नागरिकांनी मोठी गर्दी केली. परिसरातील शाळा, महाविद्यालयातील सुमारे आठ हजार विद्यार्थी त्यातील प्रदर्शन पाहण्यासाठी आले होते. हस्तकला, चित्रकला इत्यादी स्पर्धेतही विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सायंकाळी आश्रमाच्या गायक वादकांच्या भक्तिगीत गायनानंतर प. पू. महाराजांच्या संग्रहित प्रवचनाचे सादरीकरण करण्यात आले. त्यानंतर हभप धर्मभूषण गजाननदादा शास्त्री महाराजांचे प्रवचन संपन्न झाले.

# बेकायदेशीर फेरफार नोंदी प्रकरणी महसूलची कारवाई थंड बसत्यात...

## विधानसभा मध्ये तारांकित प्रश्ना नंतरही जावाबदार अधिकारी,तलाठ्यांवर कार्यवाही करण्यात दिरंगाई...

**जनसंचलन/ देऊळगावराजा**

तालुक्यातील धारण जमिनीची बेकायदेशीर रित्या फेरफार नोंदणी करून शासनाला लाखो रुपयांचा चुना लावणाऱ्या तलाठी मंडळ अधिकारी यांच्यावरील प्रस्तावित कारवाई महसूल विभागाच्या लालफीत शाहीत अडकली असून लोकप्रतिनिधींच्या तारांकित प्रश्नांनंतर मंत्रालयाकडून विचारणा ही झाली मात्र महसूल विभागाने अद्याप पर्यंत ह्या गैरप्रकाराबाबत जबाबदार मंडळ अधिकारी व तलाठी यांच्यावर प्रशासकीय कारवाई तर दूर बेकायदेशीर नोंदी रद्द ची कारवाई पण केली नाही. दरम्यान केलेल्या कारवाईचा अहवाल तात्काळ सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी पुनःश्च स्मरणपत्राद्वारे दिले आहे.

तालुक्यातील शेकडो धारण जमिनींची बेकादेशीर फेरफार नोंदणी करून नियमानुसार शासनाचा अपेक्षित लाखो रुपयांचा महसूल बुडवून मंडळ अधिकारी व काही तलाठी यांनी लाखो रुपयांचे आर्थिक हित साधल्याचा प्रकार राज्य शासन युवा पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत ज्ञानदेव खरात यांनी उघडकीस आणला होता. शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार शंभर रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर दुय्यम निबंधकांकडे तालुक्यातील असंख्य धारण जमिनीच्या नोंदी घेऊन शासनाचा लाखोंचा महसूल बुडविण्यात आल्याच्या गंभीर प्रकाराबाबत मेहकर येथील आमदार डॉ. संजय रायमुलकर यांनी विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित करून सदर प्रकरणास जबाबदार अधिकारी, मंडळ अधिकारी तलाठी यांच्यावर प्रशासकीय तथा फौजदारी कारवाई करून बेकायदेशीर नोंदी रद्द करण्याची मागणी केली होती. तदनंतर अवर सचिव महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांनी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत सदर प्रकरणातील कारवाईचा अहवाल एका पत्राद्वारे मागविला .यावर निवासी तहसीलदार यांच्या अहवालानुसार फेरफार याची चौकशी करून धारण जमिनीच्या तीनशे ते साडेतीनशे नोंदी रद्द बाबतची कारवाई सुरू असल्याचे तसेच संबंधित मंडळ अधिकारी व तलाठी यांच्यावर कारवाई प्रस्तावित करणे सुरू आहे असा अहवाल जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्याकडे पाठविला. सदर अहवालाला सुमारे आठ महिने उलटले तरीही अद्याप पर्यंत उपविभागीय महसूल सिंदखेड राजा प्रशासनाकडून कुठलीच कारवाही करण्यात आली नाही.तसेच धारण जमिनीच्या फेरफार नोंदी बेकायदेशीर घेण्यात आल्याचे प्रकरण विधानसभेत गाजल्या नंतरही महसूल प्रशासनाची कारवाई लालफीत शाहीत अडकली आहे. नुकतेच जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी सिंदखेडराजा उपविभागीय अधिकारी यांना एका पत्राद्वारे सदर गंभीर प्रकाराबद्दल केलेल्या कारवाई विषयक अहवाल तात्काळ सादर करण्याचे निर्देश एका स्मरणपत्राद्वारे दिले आहे. जिल्हाधिकारी यांनी पुढे नमूद केले आहे की आपल्या कार्यालयाचे संदर्भीत क्रमांक ५ नुसार या कार्यालयात सादर केलेल्या प्रश्न उत्तर माहिती प्रमाणे आपल्या स्तरावरून नियमानुसार कारवाई करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल विना विलंब या कार्यालयात सादर करावा असे सूचित केले आहे.विधानसभेत लोकप्रतिनिधींकडून उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांवर कारवाईचा अहवाल सादर करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी यांनी महसूल विभागाला दिलेल्या स्मरणपत्र नंतर बेकादेशीर नोंदी प्रकरणी महसूल प्रशासन काय कारवाई करणार तसेच याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी यांच्याकडे विना विलंब सादर करण्यासाठी धुळखात पडलेल्या लाल फायलींच्या फिती उकलून महसूल विभागा कडून होणाऱ्या कारवाईकडे जनतेचे लक्ष लागले आहे.




उपविभागीय अधिकारी सिंदखेड राजा यांनी विधानसभा तसेच शासनास आश्वासित केल्याप्रमाणे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कायदेशीर प्रक्रियेच्या तरतुदीचा अवलंब न करुन संबंधित गैरप्रकारास जबाबदार तलाठी व मंडळ अधिकारी यांना अभय दिला आहे. प्रशासकीय कार्यवाही तसेच निष्पन्न झालेले बेकायदेशीर अनोंदणीकृत फेरफार रद्द करण्या संबंधी कार्यवाही कडे विलंब केल्याप्रकरणी संबंधित उपविभागीय अधिकारी यांच्या विरुद्ध दप्तर दिरंगाई कायद्यान्वये प्रशासकीय कारवाईची मागणी राज्य शासनाकडे करणार आहे.

# पीएचडी करून पोरं काय दिवे लावणार? उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं सभागृहात धक्कादायक विधान...

**वृत्तसंस्था/ नागपूर**

सारथी संस्थेच्या माध्यमातून मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा दिल्या जातात. यातच पीएचडी करण्यासाठी शिष्यवृत्तीसुद्धा दिली जाते. मात्र, ती केवळ २०० विद्यार्थ्यांना दिली जाते. ही संख्या वाढविण्यात यावी, अशी मागणी काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनी विधान परिषदेत केली. यावर, राज्यात होत असलेल्या पीएचडींपैकी खरंच किती पीएचडींची आपल्याला गरज आहे? संख्या वाढवून काय करणार? पीएचडी करून पोरं काय दिवे लावणार? असं धक्कादायक विधान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भर सभागृहात केल्याने विरोधकांकडून आश्चर्य व्यक्त होत आहे. तर दुसरीकडे पी.एचडी करणाऱ्या उमेदवारांकडून अजित पवार यांच्या वक्तव्याचा धिक्कार केला जातोय.

याबाबत रणजितसिंह मोहिते पाटील यांनी प्रश्नोत्तराच्या तासात प्रश्न विचारला होता. त्यावर सुरू असलेल्या चर्चेत बंटी पाटील यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना अजित पवार यांनी राज्यातील पीएचडी आणि त्याची उपयुक्तता यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.यावेळी अजित पवार म्हणाले, संस्थेच्या माध्यमातून मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक सुविधा पुरविल्या जातात. त्यासाठी २७ जिल्ह्यांमध्ये जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या असून उर्वरित जिल्ह्यांमध्येही लवकरच त्या प्रकाशित केल्या जातील. सुरुवातीला २०० हून अधिक विद्यार्थ्यांना पीएचडीची शिष्यवृत्ती दिली जाईल असे ठरले होते. मात्र, राज्यात होत असलेल्या पीएचडी आणि त्यांची राज्याला, समाजाला व शैक्षणिक क्षेत्रातील एकूणच उपयुक्तता याचा अभ्यास राज्य सरकारद्वारे करण्यात आला. त्यानंतर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेत एक समिती नेमण्यात आली. ही समिती आता हे निर्णय घेते. सदस्यांची आग्रहाची भूमिका लक्षात घेता ही शिफारस समितीकडे केली जाईल. मात्र, ती मान्य होईलच याची खात्री नाही. पीएचडी करून पोरं काय दिवे लावणार?पीएचडीचा त्या व्यक्तीला वैयक्तिक, राज्याला तसेच समाजाला किती उपयोग होतो आहे याचा अभ्यास करण्यात आला. आजकाल कोणत्याही विषयांवर पीएचडी केली जातेय. त्यानुसार २०० चा आकडा निश्चित करण्यात आला, असे पवारांनी सांगितले. यावर काही जण तर नेत्यांवरच पीएचडी करण्यात व्यस्त आहेत, असा टोला यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लगावला. यावर पवार



म्हणाले, इत्यापेक्षा तरुण हुशार विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांकडे वळावे. यंदा संस्थेतर्फे सुविधा देण्यात आलेल्यांपैकी १७ जण युपीएससी परीक्षेत विविध सेवांसाठी उत्तीर्ण झालेत, अशी माहिती पवारांनी दिली. तसेच संस्थेतर्फे विविध शहरांमध्ये वसतीगृह व अभ्यासिका उभारल्या जात आहेत. त्यासाठी ११९७ कोटी रुपयांची तरतूदही झाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

---

# मराठा आरक्षणाचा सर्व्हे गोखले इन्स्टिट्यूटमार्फत करण्यासाठी देवेंद्र फडणवीस आग्रही: बालाजी किल्लारीकर...

**वृत्तसंस्था/मुंबई**

राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष आनंद निरगुडे यांनी राजीनामा दिल्याची माहिती मंगळवारी समोर आली. विशेष बाब म्हणजे निरगुडे यांनी ४ डिसेंबरला आपला राजीनामा सरकारकडे पाठवला होता. मात्र, त्यानंतरही सरकारने इतके दिवस ही बाब लपवून का ठेवली, यावरुन आता विरोधक आक्रमक झाले आहे. यानिमित्ताने राज्य मागासवर्ग आयोगावर अनुकूल अहवालासाठी राज्य सरकारने दबाव आणल्याच्या चर्चेने पुन्हा एकदा जोर धरला आहे. अशातच मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य बालाजी किल्लारीकर यांनी एक नवा गौप्यस्फोट केला आहे. मराठा आरक्षणासंदर्भातील सर्वेक्षण गोखले इन्स्टिट्यूटमार्फत करण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आग्रही असल्याचा दावा त्यांनी केला. ते मंगळवारी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. संपूर्ण समाजाचं आरक्षण झालं पाहिजे. त्याच्या आधारे तुलनात्मक अभ्यासाच्या आधारे मराठा समाजाचा प्रश्न सोडवला गेला पाहिजे, ही भूमिका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठकीत मान्य केल्याचे आम्हाला सांगण्यात आले होते. पण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मात्र या गोष्टीला






थोडासा आक्षेप होता. त्यांचं मत असं होतं की, गोखले इन्स्टिट्यूटमार्फतच हे काम केलं जावं आणि ते संक्षिप्त स्वरुपाच व्हावं, व्यापक स्वरुपाचं नाही. म्हणजे ते लवकरात लवकर होईल, असे त्यांचे मत असावे. यामागे काय राजकारण होते, हे आम्ही सांगू शकत नाही, असे वक्तव्य किल्लारीकर यांनी केले. किल्लारीकर यांच्या या वक्तव्यावर आता देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे हे काय प्रतिक्रिया देतात, हे आता पाहावे लागेल. बालाजी किल्लारीकर यांनी यापूर्वीही राज्य मागासवर्ग आयोगाच्या कामकाजात राज्य सरकार हस्तक्षेप करत असल्याचा आरोप केला होता. आताही त्यांनी राज्य सरकार आयोगाला गृहित धरत असल्याचा दावा केला. सरकारच्या या हस्तक्षेपामुळेच आपण आयोगाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याचे किल्लारीकर यांनी म्हटले.आनंद निरगुडे यांच्यावर राज्य सरकारचा खूप दबाव होता, त्यामुळेच त्यांनी राजीनाम्याचं हे पाऊल उचललं आहे. आनंद निरगुडे यांनी राजीनामा देऊन आठ दिवस उलटले तरी सरकारने ही गोष्ट जाहीर केली नव्हती. यात सरकारकडून कसली लपवाछपवी चालू आहे ते पाहावं लागेल. विशिष्ट प्रकारचा अहवाल देण्यासाठी मागासवर्ग आयोगावर सरकारचा दबाव होता. त्यामुळेच आयोगातील सदस्यांसह अध्यक्षांनी राजीनामे दिल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला.

# अनधिकृत खाजगी शाळांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू...

## दीपक केसरकर यांची विधानसभेत माहिती १८६ अनधिकृत शाळांपैकी १४ शाळा बंद



**वृत्तसंस्था/नागपूर**

खासगी व्यवस्थापनाद्वारे चालविण्यात येणाऱ्या ६६१ शाळा अनधिकृत सुरू असल्याचे निदर्शनास आले. या शाळा बंद करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा देखल करून दंड आकारण्याचे निर्देश देण्यात आले आहे. यापैकी ७८ शाळा बंद करून त्यातील ६ हजार ३०८ विद्यार्थ्यांचे समायोजन करण्यात आले आहेफ, अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी विधानसभेत लेखी उत्तरात दिली. राज्यात अनधिकृत शाळा सुरू असल्याचा प्रश्न आमदार मंगेश कुडाळकर यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात उपस्थित केला. मुंबई महापालिका परिक्षेत्रातील १८६ अनधिकृत शाळांपैकी १४ शाळा बंद करण्यात आल्या असून उर्वरित १७२ शाळांबाबत तपासणी सुरू आहे. विभागीय शिक्षण उपसंचालक यांना कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात आली आहे.२०१२ पूर्वीच्या अनेक शाळा स्वयंअर्थसहाय्यित शाळा अधिनियमात शिथिलता देऊन त्या शाळा नियमित करण्यासाठी शासनाकडे मागणी करण्यात आली आहे. ही बाब विचाराधीन असल्याचे केसरकर यांनी सांगितले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याना वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

## जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



**व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी**

| Size | 1 Month | 15 Day | 7 Day | Hight | Width |
|---|---|---|---|---|---|
| 8x8 cm | 5000/- | 3500/- | 2000/- | 8 cm | 8 cm |
| 5x8 cm | 3500/- | 2200/- | 1500/- | 5 cm | 8 cm |
| 5x8 cm | 3500/- | 2200/- | 1500/- | 5 cm | 23 cm |

**एक दिवसाची जाहिरात: वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.**

**One Day**

Full Page= 8000/-

1/2 Page= 5000/-

| Price | Hight | Width |
|---|---|---|
| 2600/- | 12 cm | 12 cm |
| 1800/- | 8 cm | 10 cm |
| 1300/- | 8 cm | 8 cm |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस फक्त ५०० रुपये

**अधिक माहितीसाठी संपर्क:**

अजय राजगुरे-9922359674

ऑफिस नं.-9129582958

पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा

Mail Id: jansanchlan@gmail.com